**कार्यकारी अभियंता,**

**सार्वजनिक बांधकाम प्रकल्प विभाग, पुणे.**

२ रा मजला, अर्सेनल प्लॉट, हॉटेल सागर प्लाझा समोर, पुणे कॅम्प, पुणे-४११००१.

| | |
|---|---|
| Email:- projectpune.ee@mahapwd.gov.in. <br> Email:eeprojectpune@gmail.com | Phone No.: - ०२०-२९९८५८६२ |
| जा.क्र.सा.बां.प्र.वि./प्रशा/८७६ /२०२६ | दिनांक :- १२/०५/२०२६ |


प्रति,

**अधीक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे.**

**विषय:** छत्रपती शिवाजी महाराज जन्मस्थळ किल्ले शिवनेरी ते छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ असलेल्या वढू बु. दरम्यान ६०.०० कि.मी. लांबीचा १०.०० मी. रुंदीने रस्ता "शिव-शंभू कॉरिडोर" या प्रकल्पांतर्गत विकसित करणे.

**संदर्भ:** माननीय खासदार श्री अमोल रामसिंग कोल्हे यांचे पर्यटनाला चालना देणाऱ्या "शिवशंभू कॉरिडोर"ला मंजुरी देण्याबाबतचे पत्र क्रमांक- MP/ SHR/ PN/३३८/ २०२६, दि.१२/०२/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून माननीय खासदार श्री.अमोल कोल्हे यांनी निर्देशित केलेल्या "शिवशंभू कॉरिडोर या प्रकल्पातील लांबी ही जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरूर या पर्यटन ठिकाणांच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा तालुक्यातून जात असून सदर प्रकल्पातील रस्त्याची एकूण लांबी ही ८४.७० कि.मी. असून त्यापैकी २४.५० कि.मी. हि लांबी पेठ ते नारायणगाव दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० या लांबीत असल्याने ती वगळून सदर "शिवशंभू कॉरिडॉर" या प्रकल्पाची लांबी ही ६०.०० कि.मी. इतकी आहे.सदरचा रोड हा १०.०० मी. या रुंदीत विकसित करणे प्रस्तावित आहे.

सदरचा रस्ता हा अत्यंत महत्त्वाच्या अशा ऐतिहासिक व पर्यटन स्थळांसोबतच श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मस्थळ व श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान स्थळांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. त्यासोबतच या प्रमुख महामार्गावर अष्टविनायकांपैकी दोन महत्त्वाची अशी ओझर व लेण्याद्री येथील गणपती मंदिरे येत असून त्याचप्रमाणे वाफ गाव येथील ऐतिहासिक होळकर वाडा, पेशवेकालीन टाकसाळ त्याचप्रमाणे कणेसरचे सुप्रसिद्ध धार्मिक श्री यमाई देवी मंदिर याच मार्गावर येत आहे.

त्याचप्रमाणे जुन्नर तालुक्यातील ऐतिहासिक जगप्रसिद्ध लेण्या याच प्रकल्पाच्या कक्षेत येत असल्याने सदरचा प्रकल्प पूर्ण झाल्यास सदरील संपूर्ण तीनही तालुक्यातील पर्यटनास मोठ्या प्रमाणात चालना मिळून मोठ्या प्रमाणात राज रोजगार निर्मिती होण्याची शक्यता आहे. माननीय खासदार यांनी वेळोवेळी सदर प्रकल्पाबाबत सण

२०२२ पासून आजपावेतो वरिष्ठ पातळी स्तरावर पत्रव्यवहार केलेला असून सदरचा प्रकल्प होण्याबाबत अत्यंत आग्रही भूमिका घेतलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या रस्त्याची लांबी ६०.०० कि.मी. (पेठ ते नारायणगाव हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० ची लांबी २४.५० कि.मी. वगळून) एकूण १०.००.मी. रुंदीने करणे प्रस्तावित आहे.

सदरच्या प्रकल्पास एकूण ३९० कोटी अंदाजीत रक्कम अपेक्षित आहे व आवश्यक ठिकाणी भूसंपादन करावे लागण्याची शक्यता आहे, व त्यासाठी वेगळी तरतूद आवश्यक आहे.

तरी सदरील प्रस्ताव आपल्या माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

सोबत : संदर्भीय पत्र

**(प्रशांत वि. पंडित)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम प्रकल्प विभाग,**
**पुणे.**

**प्रत:** सहाय्यक अभियंता श्रेणी.१,सा.बां.उपविभाग क्र.१, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.